# रासायनिक खतांच्या दरवाढीने पुन्हा मोडले शेतकऱ्याचे कंबरडे

## खत दरवाढीने संकट वाढले; मिश्र खतांचे दर वाढणार, लिंकिंगमुळे अडचणी

महासागर | प्रतिनिधी

**पथ्रोट,( दि.7 )** – शेतकरी आधीच अतिवृष्टी, कीडरोग, अनिश्चित बाजारभाव आणि उत्पादन खर्चाच्या वाढीने त्रस्त असताना, आता रासायनिक खतांच्या दरवाढीने त्यांच्या चिंतेत भर पडली आहे. 1 नोव्हेंबरपासून विविध रासायनिक खतांच्या दरात प्रति पोते 200 ते 300 रुपयांची वाढ करण्यात आली असून, मिश्र खतांचे भावदेखील वाढणार आहेत. या वाढीमुळे रब्बी हंगामाच्या तोंडावर शेतकऱ्यांसाठी नवे संकट निर्माण झाले आहे.



कृषिनिविष्ठा विक्रेत्यांना कंपन्यांकडून खतांसोबत वॉटर सोल्यूबल, मायक्रोला आणि मायक्रोरायझा यांसारखी पूरक खते जबरदस्तीने लिंकिंगच्या स्वरूपात घ्यावी लागतात. शेतकऱ्यांकडून या उत्पादनांना प्रतिसाद नसल्याने विक्रेत्यांना तो माल अन्य खतांसोबत विक्रीस लावावा लागतो. युरिया खताचा दर अधिकृतपणे 266 रुपये निश्चित असला तरी वाहतूक भाडे न मिळाल्याने प्रत्येक पोत्यावर 10 ते 20 रुपये अधिक आकारावे लागत असल्याची प्रतिक्रिया विक्रेत्यांकडून येत आहे.

दरवाढीमुळे शेतकऱ्यांचे उत्पादन खर्च वाढले असतानाही शेतमालाला अपेक्षित भाव मिळत नाही. सोयाबीन, कापूस, चणा आणि तूर या पिकांच्या भावात झालेल्या घसरणीमुळे अनेक शेतकऱ्यांनी सोंगणी करणे टाळले. आता खतदरवाढीच्या या नव्या झटक्यामुळे रब्बी हंगामाचा खर्च पेलणे अवघड होणार असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

### असे वाढले दर

गहू, हरभरा, कांदा यांसारख्या रब्बी पिकांसह संत्रा-आंबिया बहार फोडण्यासाठी खतांची आवश्यकता वाढते. मात्र, शासनाने ऐनवेळी दरवाढ केली आहे. प्राप्त माहितीनुसार, 10-26-26 खताचा दर 1925 वरून 2025 रुपये, 12-32-16 खताचा दर 1900 वरून 2025 रुपये, तर 14-35-14 खताचा दर 1800 वरून 2175 रुपये झाला आहे. 19-19-19 खताचा दरदेखील 1950 वरून 2075 रुपयांवर पोहोचला आहे.



# सामूहिक वंदे मातरम गायनाने दुमदुमला परिसर

### गीताच्या 150 व्या वर्षपुर्ती निमीत्त आयोजन

महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर,( दि.7 )** – 'वंदे मातरम' गीताला 150 वर्ष पुर्ण झाल्याने एकनाथराव रानडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), नांदगाव खंडेश्वर यांच्या वतीने स्थानिक नांदगाव हायस्कूलच्या प्रांगणात भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थिनी गायत्री बैस हिने सुमधुर आवाजात 'वंदे मातरम' सादर करून केली, त्यानंतर विद्यार्थी, शिक्षक आणि पाहुण्यांनी सामूहिक गायन केले. शाळेच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नाटिकेद्वारे गीताचे ऐतिहासिक महत्त्व व स्वातंर्त्यलढ्यातील भूमिका प्रभावीपणे मांडली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य प्रदीप ठाकरे यांनी भूषविले, तर मुख्य वक्ते श्रीराम बालेकर यांनी वंदे मातरम गीताचा इतिहास आणि देशप्रेमाचा संदेश स्पष्ट केला. प्रमुख पाहुण्यांमध्ये आयटीआयचे प्रभारी प्राचार्य सुरेश मेंढे, निलेश देशमुख, वैशाली अंबाडकर यांच्यासह इतर मान्यवरांचा समावेश होता.

या प्रसंगी नांदगाव व परिसरातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन रूचिका डोरस यांनी केले. देशभक्तीच्या भावनेने भारावलेल्या या सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये 'देश माझा, अभिमान माझा' ही भावना दृढ झाली.

# लोणी येथे 'पोकरा 2.0' अंतर्गत कृषी ताईसाठी एकदिवसीय प्रशिक्षण



महासागर | प्रतिनिधी

**नांदगाव खंडेश्वर,( दि.7 )**– नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा 2.0) अंतर्गत महिला शेतकऱ्यांना सक्षम बनविण्यासाठी लोणी येथे एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. दिनांक 6 नोव्हेंबर 2025 रोजी झालेल्या या प्रशिक्षणात 'कृषी ताई' साठी हवामान बदलास अनुकूल शेती, सेंद्रिय निविष्ठा निर्मिती, तसेच शाश्वत कृषी तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन देण्यात आले.

या कार्यक्रमात मास्टर ट्रेनर म्हणून पवन हूड, स्वाती सावंत आणि जयेन्द्र साळवी यांनी प्रात्यक्षिकांद्वारे कृषी ताईंचे मार्गदर्शन केले. त्यांनी महिलांची भूमिका प्रकल्पाच्या यशात किती महत्त्वाची आहे, हे अधोरेखित केले. यासोबतच 'महाविस्तार ॲप'च्या माध्यमातून कृषीविषयक माहिती सहज उपलब्ध करून देण्याच्या नव्या पद्धतीची माहितीही देण्यात आली. कार्यक्रमास उपविभागीय कृषी अधिकारी डॉ. पंकज चेडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या सोबत तालुका कृषी अधिकारी विकास पाटील, मंडल कृषी अधिकारी अजय साव आणि सहायक कृषी अधिकारी उपस्थित होते. डॉ. चेडे यांनी सांगितले की, पोकरा 2.0 प्रकल्पाचा मुख्य उद्देश महिला शेतकऱ्यांना हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर सक्षम करणे व शाश्वत शेतीकडे मार्गदर्शन करणे हा आहे. कार्यक्रमाच्या शेवटी परस्पर चर्चासत्र घेण्यात आले. या प्रशिक्षणातून कृषी ताईंना नव्या कृषी पद्धतींची माहिती मिळाल्याने त्या अत्यंत समाधानी असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# 50 बेडच्या श्रेणीत मोर्शीचे उपजिल्हा रुग्णालय जिल्ह्यात प्रथम

### वैद्यकीय अधीक्षक डॉ. पोतदार यांचा सत्कार

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी, ( दि.7 )** – अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयात नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत 50 बेडच्या श्रेणीतील मोर्शी उपजिल्हा रुग्णालयाची सन 2024-25 साठी जिल्ह्यात प्रथम क्रमांकासाठी निवड झाली आहे.



या यशाबद्दल वैद्यकीय अधीक्षक डॉ.प्रमोद पोतदार व वैद्यकीय समन्वयक डॉ.घनश्याम मानकर यांचा जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात प्रशस्तीपत्र प्रदान करून गौरव करण्यात आला. पूर्वी वरूड ग्रामीण रुग्णालय यांनीही डॉ. पोतदार यांच्या कार्यकाळात सलग दोन वर्षे (2022-23) राज्यात प्रथम क्रमांक पटकावला होता. या प्रसंगी डॉ. दिलीप सौदंळे, डॉ. कांचन भिसे, डॉ.सुनिल आवारे, तसेच विविध रुग्णालयांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या यशाचे श्रेय डॉ. पोतदार यांनी संपूर्ण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि कर्मचारी वर्गाला दिले. त्यांच्या संघटित प्रयत्नांमुळे मोर्शी उपजिल्हा रुग्णालयाने जन आरोग्य योजना राबविण्यात जिल्ह्यात अग्रस्थान मिळविले आहे.

### 23 नोव्हेंबरला महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा

**अमरावती** – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा- 2025 (टिईटी-2025) परीक्षेचे आयोजन रविवार, 23 नोव्हेंबर रोजी करण्यात आले आहे. याची सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी, असे आवाहन महाराष्ट्र राज्य परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे. या परीक्षेसाठी बंगाली, कन्नड, तेलगु, गुजराथी माध्यमांच्या विद्यार्थी/उमेदवारांची राज्यामध्ये एकूण संख्या कमी प्रमाणात असल्याने संबंधित सर्व विद्यार्थी/उमेदवारांना परीक्षा केंद्र उपलब्ध करण्यात आले आहेत.

# प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र ग्रामसेवक नेमावा

### युवाशक्ती ग्रामविकास संगठनची मुख्यमंत्र्याकडे मागणी

महासागर | प्रतिनिधी

**परतवाडा,( दि.7 )** – महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये स्वतंत्र ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक) नेमण्याची तसेच रिक्त पदे तातडीने भरून काढण्याची मागणी युवाशक्ती ग्रामविकास संगठन, महाराष्ट्र राज्य यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मंत्रालयात केली आहे.



या प्रसंगी संगठनाचे संस्थापक अध्यक्ष इमरान पठाण व सचिव पुरुषोत्तम सदार उपस्थित होते. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये नियमित ग्रामसेवक उपलब्ध नसल्याने प्रशासनातील कामकाजावर परिणाम होत आहे. अनेक ठिकाणी एका ग्रामसेवकावर दोन ते तीन ग्रामपंचायतींचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे, ज्यामुळे योजना राबविण्यात अडथळे येत आहेत. ग्रामपंचायत ही लोकशाहीचा पाया असल्याने प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी स्वतंत्र, पूर्णवेळ ग्रामसेवक असणे आवश्यक असल्याचे संघटनेचे मत आहे.

सर्व ग्रामपंचायतींना स्वतंत्र ग्रामसेवक द्यावेत, रिक्त पदांची भरती तातडीने सुरू करावी आणि कोणत्याही ग्रामसेवकावर अतिरिक्त कार्यभार देऊ नये. अशी मागणी यावेळी संघटनेकडून करण्यात आली.

# प्रा. प्रसेनजीत तेलंग यांना प्रथम पारितोषिक

### जयंत पवार कथा स्पर्धा 2025

महासागर | प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे,( दि.7 )** – अनुष्टुभ प्रतिष्ठानतर्फे आयोजित 'जयंत पवार कथा स्पर्धा 2025' चा निकाल नुकताच जाहीर झाला असून, चांदूर रेल्वेचे प्रा. प्रसेनजीत तेलंग यांच्या कथेला प्रथम पारितोषिक घोषित करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरून तब्बल 196 कथा प्राप्त झाल्या होत्या.



सर्व कथांची प्राथमिक छाननी करून उत्कृष्ट चाळीस कथा अंतिम परीक्षकांकडे पाठविण्यात आल्या. विशेष म्हणजे या कथा क्रमांकानुसार परीक्षकांकडे पाठविल्या गेल्या होत्या, ज्यामुळे परिक्षणात पूर्ण पारदर्शकता राखली गेली. यामधून प्रा. तेलंग यांची कथा सामाजिक आशयाने परिपूर्ण आणि साहित्यिक मूल्यदृष्ट्या सरस ठरल्याने पहिल्या क्रमांकासाठी निवड झाली.

प्रा. प्रसेनजीत तेलंग हे प्रोग्रेसीव्ह रायटर्स असोसिएशनचे महाराष्ट्र राज्य कार्यवाह तसेच नॅशनल कौन्सिलचे सदस्य आहेत. मागील चार महिन्यांत हा त्यांचा दुसरा राज्यस्तरीय सन्मान आहे. मुंबई येथे होणाऱ्या कार्यक्रमात त्यांना रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. या यशाबद्दल ज्येष्ठ समीक्षक, पत्रकार, कवी आणि साहित्यिकांनी प्रा. तेलंग यांचे अभिनंदन केले असून, हा सन्मान अमरावती जिल्हा आणि चांदूर रेल्वेसाठी अभिमानाची बाब ठरली आहे.

# सोहम नेसनेसकर ला राष्ट्र गौरव पुरस्कार

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, ( दि.7 )** – सोहम मोहन नेसनेसकर यांना डिजिटल प्रेस क्लब ऑफ इंडिया तर्फे 'राष्ट्र गौरव पुरस्कार 2025' ने सन्मानित करण्यात आले. मलकापूर येथील भातृ मंडळात पार पडलेल्या या भव्य सोहळ्यात महाराष्ट्रासह देशभरातील विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वांचा गौरव करण्यात आला.



आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त आयएसओ 9001-2015 प्रमाणित प्रेस क्लब ऑफ इंडिया तर्फे हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने 768 प्रस्तावांपैकी निवड करून 156 मान्यवरांना 'राष्ट्र गौरव पुरस्कार 2025' प्रदान करण्यात आला. तसेच शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी 118 शिक्षकांना 'नॅशनल आयकॉन अवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. प्रा. अनिल खर्चे होते, तर प्रमुख पाहुण्यांमध्ये ब्रह्मानंद जाधव, संजय काजळे, धनश्री काटीकर पाटील, बंडू चवरे, बाळासाहेब दामोदर व राजू वैद्य यांचा समावेश होता. कार्यक्रमाची सुरुवात आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर व तानुबाई बिरजे यांच्या प्रतिमापूजनाने झाली. पत्रकारिता, शिक्षण, सामाजिक, कला, वैद्यकीय व क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी माजी सैनिकांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र गंणगे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्रीकृष्ण तायडे यांनी केले.

# जिल्हा परिषदेच्या निविदा प्रक्रियेत अनियमिततेचा आरोप

## चौकशी करुन दोषीवर कारवाई करा — समीर जवंजाळ यांची मागणी

महासागर प्रतिनिधी

**अमरावती, ( दि.7 )**– अमरावती जिल्हा परिषदेत झालेल्या निविदा प्रक्रियेत गंभीर अनियमितता झाल्याचा आरोप समोर आला आहे. यासंदर्भात समीर जवंजाळ यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार अर्ज दाखल करून संबंधित निविदा लिपिकावर तात्काळ कारवाईची मागणी केली आहे.

तक्रारीत म्हटले आहे की, दिनांक 29 ऑक्टोबर 2025 रोजी एका विशिष्ट कामासाठी निविदा लावण्यात आली होती. मात्र, सदर निविदा नोटीस बोर्डवर नियमितपणे प्रदर्शित करण्यात आलेली नाही. उलट, 4 नोव्हेंबर 2025 रोजी फक्त पाच ते दहा मिनिटांसाठीच नोटीस बोर्डवर तात्पुरती लावण्यात आल्याचे निदर्शनास आले असून त्यानंतर ती तत्काळ काढण्यात आली.

या प्रकारामुळे निविदा प्रक्रिया अस्पष्ट आणि संशयास्पद ठरल्याचे जवंजाळ यांनी नमूद केले आहे. ठराविक ठेकेदाराला लाभ मिळावा यासाठी निविदा 'मॅनेज' केल्याचा त्यांना गंभीर आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी सदर निविदा प्रक्रिया रद्द करून ती किमान सात दिवसांसाठी पारदर्शकपणे पुन्हा प्रदर्शित करण्यात यावी. निविदा प्रक्रियेत अनियमितता केल्याबद्दल संबंधित निविदा लिपिकावर चौकशी व शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी समीर जवंजाळ यांनी केली आहे. या तक्रारीमुळे जिल्हा परिषदेतील निविदा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




# 'भावीं' च्या बॅनरबाजीमूळे मतदारांची गोची

## कोण किती कामाचा ? लोकं म्हणतात विकासाचं बोला!

बादल डकरे

**चांदूर बाजार,( दि.7 )**– चांदूर बाजार नगर परिषद निवडणुकीची घोषणा होताच शहरासह ग्रामीण भागात राजकीय वातावरण तापू लागले आहे. निवडणूक प्रक्रिया अधिकृतपणे सुरू होण्याआधीच अनेक उत्सुक उमेदवारांनी आपली राजकीय उपस्थिती दाखवण्यासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. काही ठिकाणी 'भावी नगरसेवक', 'भावी नगराध्यक्ष', 'भावी जिल्हा परिषद सदस्य' असे लिहिलेले बॅनर, फ्लेक्स आणि सोशल मीडियावरील पोस्ट मोठ्या प्रमाणात झळकू लागल्या आहेत.




या बॅनरबाजीच्या स्पर्धेमुळे सर्वसामान्य मतदारांमध्येही चर्चांना उधाण आले आहे. काही जण या गोष्टींकडे उमेदवारांचा आत्मविश्वास म्हणून पाहतात, तर काही जण याला दिखाव्याची स्पर्धा मानतात. निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याआधीच काही उमेदवार स्वत:ला 'भावी सदस्य' किंवा 'भावी अध्यक्ष' म्हणून घोषित करतात, यावरून त्यांच्या राजकीय उत्सुकतेचा आणि आकांक्षेचा अंदाज येतो. मात्र या बॅनरबाजीने मतदारांचे मन किती जिंकले जाईल, हा प्रश्न अनुत्तरितच आहे. सोशल मीडियाच्या युगात मतदार अधिक सजग झाले आहेत. फक्त बॅनर आणि पोस्टर लावून लोकांचा विश्वास जिंकता येत नाही, हे अनेक निवडणुकांमधून सिद्ध झाले आहे. मतदार आता उमेदवारांच्या प्रत्यक्ष कामकाजावर, स्वच्छ प्रतिमेवर आणि विकासाभिमुख विचारांवर लक्ष केंद्रित करत आहेत. दरम्यान, काही ठिकाणी प्रशासनाने अनधिकृत बॅनरबाजीवर अद्याप कारवाई सुरू केलेली नाही. मात्र निवडणूक आचारसंहिता लागू झाल्यानंतर अशा प्रकारच्या प्रचारावर कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे.

### विकास, पारदर्शकता, सेवाभाव पाहूनच निर्णय

प्रशासनाने सर्व उमेदवारांना जबाबदारीने वागण्याचे आवाहन केले आहे. फेसबुक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्रामसारख्या माध्यमांवर 'जनतेचा आशीर्वाद मिळवण्यासाठी मैदानात उतरत आहे' अशा पोस्ट आणि व्हिडिओंची रेलचेल सुरू झाली आहे. पण शेवटी मतदार विकास, पारदर्शकता आणि सेवाभाव पाहूनच निर्णय घेतात, हे उमेदवारांनी विसरू नये.

# तत्कालीन ग्रामसेवकावर होणार कारवाई!

### हॉटेल कोनार्क प्रकरण

**अचलपूर,( दि.7 )** – अचलपूर तालुक्यातील मौजा गौरखेडा (कुंभि) येथील जागरूक नागरिक नितीन एकनाथराव शिंदे यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे ग्रामपंचायत गौरखेडा (कुंभि) आणि संबंधित पदाधिकारी गंभीर अडचणीत आले आहेत. त्यांनी हॉटेल कोनार्कच्या अनुज्ञापत्रासंदर्भात उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठात नागरी रिट याचिका दाखल केली आहे.




ही याचिका महाराष्ट्र निषेध अधिनियम, 1949 अंतर्गत दिलेल्या आदेशावर आधारित आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी 5 फेब्रुवारी 2024 रोजी हॉटेल कोनार्कचे फॉरेन लिकर्स-III अनुज्ञापत्र निलंबित केले होते. परंतु राज्य आबकारी आयुक्तांनी 28 फेब्रुवारी 2024 रोजी या आदेशावर स्थगिती दिली. हा स्थगिती आदेश मनमानी व नियमविरुद्ध असल्याचे सांगत, शिंदे यांनी तो रद्दबातल करण्यासाठी कलम 226 व 227 अंतर्गत याचिका दाखल केली आहे. या प्रकरणात महाराष्ट्र राज्य, राज्य आबकारी विभाग, जिल्हाधिकारी अमरावती, आबकारी निरीक्षक अचलपूर, ग्रामपंचायत गौरखेडा आणि हॉटेल कोनार्क यांना प्रतिवादी करण्यात आले आहे. ग्रामपंचायतीने अनुज्ञापत्र मंजुरी प्रक्रियेत नियमबाह्य पद्धती अवलंबल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, या संदर्भात तत्कालीन ग्रामसेवकावर कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गावात या प्रकरणाची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू असून, नितीन शिंदे यांच्या कायदेशीर लढ्याचे कौतुक केले जात आहे. न्यायालयीन निर्णय येत्या काही महिन्यांत लागण्याची अपेक्षा आहे. या याचिकेमुळे ग्रामपंचायत आणि आबकारी विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

RNINO-46975/1985
Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५
महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

